पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे कार्यालय,
चव्हाण नगर, पाषाण रोड, पुणे 411 008
दूरध्वनी क्रमांक 020- 25657878 फॅक्स क्र. 020- 25674641
ई मेल sp.pune.r @mahapolice.gov.in संकेतस्थळ
www.puneruralpolice.gov.in

निविदा जाहिरात - नवीन कामे : वर्ष २०२५-२०२६

जा.क्र- **पशा-११**/कोरेगाव भिमा २०२६ /२०२५

पुणे, दिनांक /१२/२०२५

पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण या आस्थापनेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे या वर्षी दिनांक ०१/०१/२०२६ रोजी मौजे पेरणे फाटा, ता- हवेली फाटा, ता- हवेली, जि- पुणे येथे पार पडणाऱ्या कोरेगाव भिमा विजयस्तंभ शौर्य दिन साजरा करण्याकरिता प्रशासकीय सोयीसाठी निविदा पध्दतीने पुरवठादार/ निविदाकार यांचे पुढील कामकाजाची किमान दरात सेवा उपलब्ध करून घेणेकामी बंद लिफाफ्यात निविदा मागविण्यात येत आहे.

निविदा क्रमांक	कामाचे नाव	अंदाजित पुर्व गणित रक्कम रू.
SPPUNER/ MT3	१० वाहने खाजगी अधिग्रहन ५० सीटर बस वाहने (आवश्यक ४ दिवसांकरिता)	६,००,०००/-

महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस २०२१/प्र.क्र. ८/उद्योग-४, दिनांक ०७ मे, २०२१ अन्वये दरपत्रकाचे आधारे वरील सेवा उपलब्ध करून घेण्यात येणार आहे.

तरी सदर दरपत्रके/ निविदा व स्विकृती उघडण्याची कार्यवाही कालावधी हा पुढीलप्रमाणे राहील.

निविदा फॉर्म/ दरपत्रके सादर करणेची दिनांक	-	दिनांक २२/१२/२०२५ सकाळी १०.३० वा ते दिनांक २६/१२/२०२५ दुपारी १२.०० वाजेपर्यत.
निविदा फॉर्म/ दरपत्रके स्विकृतीचा अंतिम दिनांक	-	२६/१२/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यत
निविदा फॉर्म/ दरपत्रके उघण्याचा दिनांक	-	२६/१२/२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता (शक्य झाल्यास)

अ) सदर कामांबाबत निविदा अटी/ शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केला असुन सदर कामांचे निविदा संच www.puneruralpolice.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

ब) निविदा संच हा शेवटच्या दिवशी प्राप्त न झाल्यास सेवा पुरवठादार/ ठेकेदारांची पुनश्च नव्याने निविदा जाहिरात प्रसिध्द करण्यात येणार नाही. निविदाकार यांनी अंदाजित पुर्व गणित रक्कम दर्शविल्याप्रमाणे लिफाफ्यामध्ये रक्कम कमी दराने रेट कोट करावयाचा आहे. दर्शविलेल्या रक्कमेपेक्षा जादा दराने रेट कोट करण्यात आलेली निविदा बाद समाजवण्यात येईल.

क) महत्वाची सूचना :- सदर कार्यालय कायदा व सुव्यवस्था राखण्याचे अत्यंत महत्वाचे काम करीत असल्यामुळे निविदा उघडणेची तारीख व वेळ कधीही बदल / रद्द / पुढे ढकलण्यात येवू शकते.

ड) सदर निविदेची मुदतवाढ झाल्यास वर्तमानपत्रात जाहिरात दिली जाणार नाही. संबधितानी वेबसाईटला भेट देवुन लक्ष दयावे. मागविलेल्या निविदा कोणत्याही स्तरावर कोणतेही कारण न देता रदद करण्याचे अधिकार पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनी राखुन ठेवलेले आहेत.

इ) अनुदान अभावी निविदा रदद झाल्यास निविदाकार यांनी सादर केलेली निविदा शुल्क/सादर कागदपत्रे परत करणेबाबत कार्यालय कसल्याही प्रकारची हमी देत नाही.

ई) निविदाकार यांनी बंध लिफाफ्यामध्ये दरकोटेशन लेटर हेड वर दयावे तसेच या निवीदेत सादर करण्यात आलेला (नमुना फॉर्म-१) भरून सादर करणे अनिवार्य राहील. तसेच निविदाकार एल-१ ठरल्यावर नमुना फॉर्म-१ मधील सर्व कागदपत्रांचा संच कार्यालयानी पुरवठा आदेश दिल्यानंतर जमा करावे लागेल.

जी) तरी तांत्रिक दृष्टया पात्र असणा-या निविदाकार दरपत्रके बंद पाकिटात खरेदी समिती समक्ष सादर करणेची दक्षता घ्यावी.

मा. पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे मान्यतेने

(दिलीप शिंदे)
पोलीस उप-अधीक्षक (मुख्या.).,
पोलीस अधीक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण.

प्रति, सर्व मससर्स,

प्रत प्रसिध्दीकामी :- पोलीस निरीक्षक, सायबर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण

(नमुना फॉर्म-१)

१	निविदाकार कंपनीचे पूर्ण नाव व पत्ता दूरध्वनीसह	
२	निविदाकार कंपनीचे व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक (Company incorporation / Shop Act No.)	
३	निविदाकार कंपनीचे / मालकाचे PAN Card / TAN Card. क्रमांक	
४	निविदाकार कंपनीचे GST Registration Certificate. क्रमांक	
५	निविदाकार कंपनी किंवा त्यांचे मालक / संचालक / भागीदार व त्यांचे जवळचे नातेवाईक यांच्यावर कोणत्याही सरकारी किंवा निमसरकारी कार्यालयामध्ये फसवणुकीची / गैरप्रकाराची किंवा भ्रष्टाचाराची कोणतीही चौकशी चालू / प्रलंबित नसली पाहिजे. तसेच निविदाकार कंपनीचा समावेश सरकारी काळ्या यादीत नसला पाहिजे. अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र **कंपनीच्या लेटर हेडवर** देणे बंधनकारक आहे. (सोबत नमुना परिशिष्ट - ०१)	
६	निविदाकार कंपनीचे मालक / संचालक / भागीदार व त्यांचे जवळचे नातेवाईक उदा. आई, वडील, भाऊ, बहीण, पत्नी, पती, मुलगा, मुलगी यांच्या नावावर दोन किंवा जास्त समान व्यवसाय करणाऱ्या स्वतंत्र अथवा भागीदारीमध्ये वेग वेगळ्या कंपन्या रजिस्टर / नोंदणीकृत असल्यास सदर कंपनी व मूळ कंपनी अशा दोन किंवा जास्त निविदा सादर करता येणार नाहीत. तसेच अशा प्रकारच्या दोन किंवा जास्त निविदा एकाच वेळी व एकाच निविदेसाठी इतर कोणत्याही शासकीय कार्यालयात सादर केल्या असतील व तसे करुन मूळ कंपनीच्या नावावर काम घेतले असेल किंवा नसेल, अशा कंपन्यांना साखळी करुन (Ring) निविदा प्रक्रिया केली, असे संबोधले जाईल व अशा कंपन्यांच्या निविदा रद्द करण्यात येतील. निविदा सादर करणाऱ्या सर्व निविदाकारांनी स्वतःचे प्रतिज्ञापत्र सोबत जोडलेल्या नमुन्या प्रमाणे **कंपनीच्या लेटर हेडवर** देणे बंधन कारक आहे. (सोबत नमुना परिशिष्ट - ०२)	
७	(उदा. 2022-23, 2023-24, 2024-25) प्रपत्र-३ प्रमाणे चार्टर्ड अकाउंटंट यांचे प्रमाणित केलेले मागील 3 आर्थिक वर्षांतील आयकर रिटर्न आणि UDIN क्रमांकासह चार्टर्ड अकाउंटंट ने प्रमाणित केलेले	
८	वाहने अधिग्रहन/ भाडेतत्वावर सेवा पुरविताना प्रादेशीक परिवहन अधिकारी पुणे यांचे दिनांक १२/०१/२०२४ बैठकीमधील पत्रात नमूद केलेप्रमाणे अटी व शर्ती भाडे दर यांचे अधीन राहुन /अधिकृत केलेले दैनिक दराप्रमाणेच एकुण ४ दिवसांकरिता येणारा एकुण खर्च हा नमुद करणे आवश्यक आहे. (सोबत नमुना परिशिष्ट - ०३)	

सही

निविदाकार कंपनीचे मालक / भागीदार / संचालक

(कंपनीचा शिक्का)

***** **कंपनीच्या लेटर हेडवर*****

(१) परिशिष्ट -1

(मालकाचे / भागीदार / संचालक यांचे प्रतिज्ञापत्र)

प्रतिज्ञापत्र

मी / आम्ही ---------- (मालकाचे / भागीदारांचे / संचालकांचे नाव व पत्ता) ----------पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयामध्ये / **आस्थापनेवर कोरेगाव भिमा बंदोबस्त सन 2026 च्या अनुषंगाने साधन सामुग्री/ सेवा पुरवठा** करणेबाबत निविदा---------- ही साधन सामुग्री / **सेवा पुरवठा** ----------नग संख्या---------- पुरवठा करणेकामी (निविदाकार कंपनीचे नाव व पत्ता) ---------- नावाने भरत आहोत. सदर सेवा कायदा व सुव्यवस्था बंदोबस्त कालावधी दिनांक 30/12/2025 ते दिनांक 02/01/2026 पर्यंत आम्ही सेवा देणेस कटीबध्द आहे.

मी / आम्ही तसेच माझी कंपनी यांचे विरोधात कोणत्याही सरकारी कार्यालयामध्ये निविदा भरण्याच्या दिनांक- 15/12/2025 रोजी पर्यंत कोणतीही गैरप्रकार, अफरातफर गैरव्यवहार, फसवणूक तसेच भ्रष्टाचार या विषयी कोणतीही चौकशी चालू नाही किंवा प्रलंबित नाही.

तसेच अशा प्रकारची कोणतीही चौकशी माझे / आमचे जवळचे नातेवाईक (आई / वडील / बायको / नवरा / भाऊ / बहीण) यांचे विरोधात सुध्दा चालू नाही.

सही

निविदाकार कंपनीचे मालक / भागीदार / संचालक

******* कंपनीच्या लेटर हेडवर*******

(२) परिशिष्ट - 2

(मालकाचे / भागीदार / संचालक यांचे प्रतिज्ञापत्र)

प्रतिज्ञापत्र

मी / आम्ही ———————————— (मालकाचे / भागीदारांचे / संचालकांचे नाव व पत्ता) ———————————— पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयामध्ये / **आस्थापनेवर कोरेगाव भिमा बंदोबस्त सन 2026 च्या अनुषंगाने साधन सामुग्री / सेवा पुरवठा** करणेबाबत निविदा———————— ही साधन सामुग्री / **सेवा पुरवठा** ————————————नग संख्या———————— पुरवठा करणेकामी (निविदाकार कंपनीचे नाव व पत्ता) ———————————— नावाने भरत आहोत.

मी / आम्ही सदर कंपनीचे संचालक असून आमच्या संचालकांच्या जवळच्या नातेवाईक (मालक / संचालक व त्यांचे जवळचे नातेवाईक उदा. आई, वडील, भाऊ, बहीण, पत्नी, पती, मुलगा, मुलगी) यांच्या नावावर दोन किंवा जास्त समान व्यवसाय करणाऱ्या स्वतंत्र अथवा भागीदारीमध्ये वेग वेगळ्या कंपन्या रजिस्टर आहेत / नाहीत. (असल्यास त्यांची नावे देण्यात यावीत.)

तसेच सदर दोन किंवा त्यापेक्षा जास्त असणाऱ्या कंपन्यांनी मिळून कोणत्याही एका शासकिय निविदा प्रक्रियेमध्ये एकत्र सहभाग नोंदविलेला नाही. तसेच अशा प्रकारचे कोणतेही शासकीय काम घेतलेले नाही. अशा प्रकारची तक्रार आढळून आल्यास मला व माझ्या कंपनीला सदर निविदा प्रक्रियेमधून रद्द करण्यात येईल, याची मला जाणीव आहे.

सही

निविदाकार कंपनीचे मालक / भागीदार / संचालक

मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ६२(३) मधील तरतुदीअन्वये परिचलन पद्धतीने प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पुणे, पिंपरी-चिंचवड व बारामती यांची संयुक्त बैठक क्रमांक ७२ दिनांक १२.०१.२०२४ रोजीचा ठराव

विषय : शासकीय कामासाठी अधिग्रहित करण्यात येणाऱ्या वाहनांचे भाडेदर ठरविण्याबाबत.

१) शासकीय व इतर कार्यालयांमध्ये वाहनांचे वापरासंबंधी धोरणाच्या अनुषंगाने प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, पुणे यांनी दिनांक १७.०५.२०२० रोजी झालेल्या बैठकीत वाहनांचे दर ठरविण्यात आले होते.

२) वाढते इंधनदर, वाहनाची किंमत, विमा हप्ता, इंधन व वंगण दर, देखभालीचा खर्च, वाहनाच्या सुट्या भागांच्या किंमती, कर्जफेडीचा हप्ता, चालकाचे वेतन, महागाई निर्देशांक इत्यादी बाबी विचारात घेणे आवश्यक आहे. त्यास अनुसरुन सोबतच्या **प्रपत्र-अ** प्रमाणे सुधारीत दर प्रस्तावित करण्यात येत आहेत.

३) शासकीय कामासाठी वाहने अधिग्रहीत करण्यासाठी सदरचे सुधारित दर लागू करावेत.

अटी व शर्ती

१) वाहनाचे इंधन खर्च वाहन मालकाचा राहील.

२) प्रत्येक वाहनासाठी तपशिलवार माहिती असेलेले स्वतंत्र लॉगबुक ठेवावे.

३) वाहन ताब्यात घेतल्यापासून ते परत केल्यापर्यंतचा कालावधी भाडे अदायगीसाठी धरला जाईल.

४) पहिल्या २४ तास किंवा त्याच्या भागाकरिता २४ तासाचे भाडे देय राहिल.

५) २४ तासात ३०० कि.मी.पेक्षा जास्त धाव झाल्यास जास्तीच्या धावेसाठी प्रति कि.मी. भाडे देय होईल.

६) ह्या दराव्यतिरिक्त कुठलेही भत्ते/चार्जेस अनुज्ञेय नसतील.

७) हलके संवर्गातील वाहने शक्यतो ५ वर्षापेक्षा जास्त जुनी नसावीत.

८) वाहनाचा देखभाल खर्च, इतर खर्च तसेच अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी वाहन मालकाचीच राहील.

९) वाहन नादुरुस्त, खराब, अपघातग्रस्त झाल्यास लगेचच दुसरे बदली वाहन पुरविण्याची जबाबदारी वाहन मालकाची असेल.

१०) वाहनाचे / चालकाचे सर्व कागदपत्रे जसे नोंदणी, कर, विमा, योग्यता प्रमाणपत्र, परवाना, प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र, चालकाची अनुज्ञप्ती, बिल्ला इत्यादी वैध असणे आवश्यक आहे.

११) टोल व पार्किंग चार्जेस लागू असल्यास वाहन वापरणाऱ्या कार्यालयाने भरावयाचे आहे.

१२) देय असलेल्या वस्तू व सेवा करांचा समावेश नमूद केलेल्या दरात नाही.

१३) आयकर विभागाच्या नियमानुसार देय असलेल्या टीडीएस कपात करण्यात येईल.

प्रपत्र-अ

शासकीय कामासाठी अधिग्रहित करण्यात येणाऱ्या वाहनांचे भाडेदर

अ.क्र.	वाहनाचा प्रकार	आसनक्षमता (कमीत कमी)	२४ तासाचे भाडे रु.	भाडे प्रति कि.मी. रु.
	दुचाकी/तीनचाकी (प्रवासी)			
१	मोटार सायकल	१ + १	७००	८
२	ऑटोरिक्षा	३ + १	१२५०	१६
	हलके मोटार वाहन (प्रवासी)			
३	अवातानुकुलीत टॅक्सी-हॅचबॅक (टाटा इंडिका / व्हीस्टा, स्वीफ्ट इ.)	४ + १	२८८८	१२
४	टॅक्सी वातानूकुलीत हॅचबॅक (टाटा इंडिका / व्हीस्टा, स्वीफ्ट इ.)	४ + १	३०८८	१४
५	टॅक्सी अवातानूकुलीत सेदान (इंडिगो, स्विफ्ट डिझायर, होंडा अॅमेझ, ह्युंडाई अॅक्सेंट इ.)	४ + १	३०८८	१४
६	टॅक्सी वातानूकुलीत सेदान (इंडिगो, स्विफ्ट डिझायर, होंडा अॅमेझ, ह्युंडाई अॅक्सेंट इ.)	४ + १	३३००	१५
७	जीप सदृष्य अवातानुकुलीत वाहने (सुमो / टेम्पो ट्रॅक्स, इको इ.)	६ + १	३७००	१७
	स्पोर्ट युटिलिटी व्हेईकल्स			
८	एसयुव्ही अवातानुकुलीत (इनोव्हा, झायलो, तवेरा, इर्टीगा इ.)	६ + १	५१२५	२०
९	एसयुव्ही वातानुकुलीत (इनोव्हा, झायलो, तवेरा, इर्टीगा इ.)	६ + १	५८८८	२२
	प्रवासी बस (नॉन एसी)			
१०	बस	१४ + १	६०००	१८
११	बस	१७ + १	६६००	२१
१२	बस	२५ + १	१०२००	३२
१३	बस	३५ + १	१२०००	३८
१४	बस	४५ + १	१४४००	४६
१५	बस	५० + १	१५०००	४८
	मालवाहू वाहने			
१६	हलके मालवाहू मोटार वाहन (LMV Goods)	GVW upto 7500 kgs	४२००	१४
१७	मध्यम मालवाहू मोटार वाहन (MGV Goods)	GVW from 7501 kgs to 12000 kgs	५८००	१८
१८	जड मालवाहू मोटार वाहन (HGV Goods)	GVW 12001 kgs and above	६४००	२०

पाण्याचे टँकर

१९	पाण्याचा टँकर	Upto 3000 Ltr	रु.६०० प्रतीतास
२०	पाण्याचा टँकर	Upto 9000 Ltr	रु.७०० प्रतीतास
२१	पाण्याचा टँकर	Upto 12000 Ltr	रु.११०० प्रतीतास

अर्थमुव्हींग मशिन्स

२२	ट्रक्टर ट्रेलर		३४००
२३	जेसीबी		रु.९००/- प्रतीतास
२४	पोकलँड २१०		रु.२५००/- प्रतीतास

प्राधिकरणाच्या विचारार्थ व निर्णयार्थ सादर

	मान्य	अमान्य	सही
मा. अध्यक्ष प्रादेशिक परिवहन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी, पुणे	✓		
मा. सदस्य प्रादेशिक परिवहन प्राधिकरण तथा पोलिस उप आयुक्त वाहतूक, पुणे	✓		

सचिव
प्रादेशिक परिवहन प्राधिकरण तथा
प्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी चिंचवड

सचिव
प्रादेशिक परिवहन प्राधिकरण तथा
प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे